अनोखा उपक्रम : स्वयंसेवक मोफत सेवा पुरवितात

# एकाकी रुग्णांसाठी 'बीइंग विथ यू' संस्था ठरतेय आधारवड

अमोल अवचिते
लोकमत न्यूज नेटवर्क

## गरजूंना आवश्यकतेनुसार २ ते ३ तास सेवा देतात

- या संस्थेच्या माध्यमातून ही सेवा शहरातील विविध रुग्णालये, तसेच विविध भागांमध्ये आणि आवश्यकतेनुसार घरी जाऊन सेवा पुरवितात. या उपक्रमामध्ये ३५ ते ६० वयोगटांतील सुमारे ५० पेक्षा अधिक स्वयंसेवक कार्यरत आहेत. गरजूंना आवश्यकतेनुसार दोन ते तीन तास सेवा देतात.
- तत्पूर्वी ही सेवा पुरविणाऱ्या स्वयंसेवकांची आणि ज्या व्यक्तीला ही सेवा हवी आहे, अशा व्यक्तीची सविस्तर माहिती संस्थेकडे नोंदवली जाते. सर्वांसाठी मोफत असणाऱ्या या सेवेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी त्यांना कोणत्या तारखेला सेवा हवी, याचा तपशील संस्थेला पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसारच ही सेवा पुरविली जाते, असे संस्थेचे श्रीरंग पाळंदे यांनी सांगितले.



पुणे : आधुनिक युग हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. सगळ्याच क्षेत्रांमध्ये स्पर्धा असल्याने प्रत्येकाचे जीवन धकाधकीचे झाले आहे. स्वत:कडे लक्ष द्यायला थोडाही वेळ नसल्याचे सहज बोलले जाते. स्वत: किंवा घरातील एखादी व्यक्ती आजारी पडली तर अडचण होऊन बसते. रुग्णाकडे लक्ष द्यावे की नोकरीकडे, असा प्रश्न अनेकदा निर्माण होतो. अशा एकाकी रुग्णांसाठी तसेच नातेवाईकांसाठी 'बीइंग विथ यू' ही संस्था आधारवड म्हणून पुढे सरसावली आहे.

वाढत्या नागरीकरणामुळे, नोकरीनिमित्त किंवा किमान जागेअभावी वेगळे राहण्याची वेळ अनेकदा कुटुंबावर येते. त्यामुळे आज एकत्र कुटंब पद्धतीचा ऱ्हास होत आहे. अशी आज परिस्थिती आहे. ज्येष्ठ नागरिक, घरात राहणारी व्यक्ती एकाकी जीवन जगू लागली आहेत. घरातील व्यक्तीचे आजारपणदेखील नकोसे झाले आहे. रुग्णालयात किंवा घरातील आजारपणाला वेळ देताना अनेकदा नातेवाईकांची चांगलीच दमछाक होते.

अशा रुग्णांच्या नातेवाईकांना आणि घरात एकाकी असलेल्या व्यक्तींना आधार मिळावा, यासाठी 'बीइंग विथ यू' संस्थेतर्फे मोफत 'वृद्ध व रुग्ण सहायता स्वयंसेवक सेवा' हा अनोखा उपक्रम श्रीरंग पाळंदे, माधवी ठाकूरदेसाई, नितीन ठाकूरदेसाई, अस्मिता पटवे, उपेंद्र पेंडसे यांच्या संकल्पनेतून सुरु केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून घरातील एखादी वृद्ध व्यक्ती किंवा इतर कोणी रुग्ण असेल आणि नातेवाईकांना त्यांच्या बाहेरील कामासाठी किंवा नोकरीसाठी बाहेर जायचे असेल, तर हे स्वयंसेवक घरी अथवा रुग्णालयातील रुग्णाला सोबत करतात.

रुग्णाच्या नातेवाईकांना त्यांच्या गरजेनुसार 'रिलिव्हर अटेंडंट' म्हणून स्वयंसेवक मोफत सेवा पुरवतात.